# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) आरवली ते माखजन रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(१) ३१७२ (२२-१२-२०१४). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) आरवली ते माखजन रस्त्याची दुतर्फा साईडपट्टी व काही ठिकाणी मोऱ्या खचलेल्या असून सदर मार्गावरुन वाहतूक करताना वाहनचालकांना अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावरील साईडपट्या दुरुस्ती, रस्त्याचे डांबरीकरण व मोऱ्यांची दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०१-२०१६) :** (१) नाही.
(२) प्रश्नांकित लांबीतील कि.मी. ३/०० ते ८/०० या लांबीतील पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रीत खडीने भरण्यात आले आहे. तसेच कि.मी. १/३४५ मधील मातीची शुष्क काळया दगडाची काही प्रमाणात ढासळलेली भिंत बांधण्यात आली असून खचलेला भराव सुस्थितीत करुन रस्त्यावरील वाहतूक सद्यस्थितीत सुरळीत चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्जावरील व्याज माफीबाबत

**(२) ५२८२ (१०-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना पीक कर्जावरील व्याज माफीची मा.मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषणेचे आदेश राज्यातील जिल्हा सहकारी बँकासह राष्ट्रीयकृत, प्रादेशिक व खासगी बँकांना

लागू राहतील असे नमूद करणे आवश्यक असतानाही ते नमूद करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मा.मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषणेनुसार शेतक-यांना पीक कर्जावरील व्याज माफ करण्यासाठी जिल्हा सहकारी बँकेसह इतर राष्ट्रीयकृत, प्रादेशिक व खासगी बँकानाही आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापी, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) शासनाकडील दि. ११.०२.२०१५ व सहकार आयुक्तालयाकडील दि. २७.०३.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे रुपांतरीत होणाऱ्या पीककर्जावरील सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील संपूर्ण व्याज बँकांना शासनामार्फत अदा करण्यासाठीचे प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून मागविण्यात आले आहेत.

---

**मुंबई - गोवा रोडवर समुद्र मार्गे केळशी खाडीवरील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(३) ६५३० (०९-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई - गोवा रोडवर समुद्र मार्गे केळशी खाडीवरील पुलाचे बांधकामासंदर्भात सद्यःस्थिती काय आहे,
(२) सदर पुलाचे बांधकाम कधीपर्यंत सुरु होण्याचे अपेक्षित आहे, त्याकरिता किती खर्च अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०१-२०१६) :** (१) विषयांकित पूलाचे काम सन २००६ मध्ये प्रगतीत होते. केळशी बाजूकडील पोचमार्गामध्ये वाळूची टेकडी येत असल्याच्या मुद्द्यावरुन प्रणव तिर्थ मिशन, पूणे या संस्थेने उच्च न्यायालयाला जनहित याचिका दाखल केली. सदर जनहित याचिकेवर न्यायालयाने जैसे थे स्थितीत काम बंद ठेवण्याचे आदेश दिल्याने सद्यस्थितीत काम बंद आहे. तत्पूर्वी पूलाचे वेळास बाजूकडील १ गाळ्याचे व ४ पिअर्सचे वेलकॅप पर्यंत काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच पोचमार्गाच्या मातीकाम व मोऱ्याचे ९० टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे.
(२) उच्च न्यायालयाच्या स्थगितीचे आदेश उठल्यानंतर काम सुरु करण्यात येईल व त्यासाठी अंदाजे रु.८४९.६६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील अनेक मजूर कामगार सहकारी संस्था मजुरांचे आर्थिक शोषण करित असल्याबाबत**

**(४) ७२६६ (०७-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील अनेक मजूर कामगार सहकारी संस्था मजुरांचे आर्थिक शोषण व पिळवणूक करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तद्नुसार मजुर कामगार सहकारी संस्थांच्या अध्यक्ष व सचिवांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) नाही. मात्र मजुर कामगार सहकारी संस्था संदर्भातील तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांच्याकडे प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीची चौकशी सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड करीत आहेत.

(२) चौकशी चालू आहे.

(३) चौकशी चालू आहे.

(४) संस्थानी दप्तर तपासणीकरीता दप्तर उपलब्ध करुन न दिल्यामुळे दप्तर प्राप्त करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० अन्वये कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तहसिलदार कार्यकारी दंडाधिकारी मुरबाड यांचेकडे दि.०६.०५.२०१५ व दि.२६.०५.२०१५, दि.०१.०६.२०१५ रोजी स्मरपणपत्र देण्यात आलेली आहेत.

---

**उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत**

**(५) ७७०९ (१५-०५-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रचंड अडचणीत असल्याने ठेवीदाराचे व खातेदाराचे पैसे देणे शक्य नसल्याने शासनाकडून आर्थिक मदत देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सहकार व पणन मंत्री यांना दिनांक ९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुसार मा.सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संबंधितांची बैठक माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा दम्यान घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत मा.सहकार मंत्री यांनी व्याज सवलत योजनेचे रू.२० कोटी तात्काळ बँकेस अदा करण्याचे निर्देशित करून देखील सदर रक्कम बँकेला अद्याप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रक्कम बँकेला न मिळण्याबाबत विलंबाची कारणे काय आहेत,

(५) तसेच उक्त बैठकीच्या अनुषंगाने मा.सहकार मंत्री यांच्या आदेशानुसार बँकेने इतर मागण्यांबाबतचा प्रस्ताव विभागीय सहनिबंधकामार्फत सहकार आयुक्ताकडे नव्याने सादर केला, हेही खरे आहे काय, असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) होय, १ डिसेंबर २०१४ रोजीच्या बैठकीच्या अनुषंगाने बँकेने खालील ३ प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत.

1) शासकीय भागभांडवल रु. १५४४.०० लाख.
2) अडचणीतील जिल्हा बँकेच्या धरतीवर केंद्र/राज्य सरकारकडून आर्थिक मदत रु.१००.०० कोटी.
3) ५० कोटी सॉफ्ट लोन बाबत.

---

### जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने रामनगर पोलिस वसाहतीमधील प्रत्येक गाळ्यांमध्येही प्रत्येकी एक लाखाची कामे करुन ३८ लाख रुपयांची देयके काढण्यात आल्याबाबत

**(६) ८७०८ (१०-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने रामनगर पोलिस वसाहतीमध्ये प्रत्येक गाळ्यांमध्येही प्रत्येकी एक लाखाची कामे करुन ३८ लाख रुपयांची देयके काढण्यात आली असून अधिक्षक अभियंता या कामांना एकाच आर्थिक वर्षात दोनदा मंजूरी दिल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या निधीतून करावयाच्या रस्त्यांची अपेक्षित कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने केली नसल्याबाबत व वितरीत निधीतही अनियमितता झाल्याबाबत**

**(७) ९३५३ (१०-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्य शासनाकडून निधी नसल्याचे कारणे देवून टोलचे रस्ते खाजगी कंत्राटदारामार्फत उभारण्याचा आग्रह धरला जात असतानाही प्रत्यक्षात मात्र क्रेंद्र सरकारच्या निधीतून करावयाच्या रस्त्याची अपेक्षित कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलीच नाहीत असा ठपका महालेखाकाराच्या अहवालात ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) केंद्र व राज्य सरकारच्या निधीतून २.७० लाख किलोमीटर रस्ते बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असताना यापैकी २.४३ लाख कि.मी. रस्तेच पूर्ण व त्यासाठी वितरी केलेल्या निधीतही सार्वजनिक बांधकाम विभागांकडून अनियमितता झाल्याचा संशयही व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यात १९८१ ते २०११ या कालावधीत निश्चित केलेले रस्ते बांधण्याचे उद्दिष्ट ३२ वर्षातही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-१२-२०१५) :** (१) अशी बाब आढळून आलेली नाही.

(२) अशी बाब आढळून आलेली नाही.

(३) सन १९८१ ते २००१ व सन २००१ ते २०१२ या दोन रस्ते विकास योजनामध्ये अनुक्रमे २,७५,७२३ कि.मी. व ३,३६,९५४ कि.मी. रस्ते विकासाचे उद्दीष्ट ठरवण्यात आले आहे. यापैकी १९८१-२००१ मध्ये २,४१,७१२ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या विकास करण्यात आला असून सन २००१-२१ अंतर्गत मार्च २०१४ पर्यंत २,६३,७०८ कि.मी. इतक्या लांबीच्या रस्त्याचा विकास करण्यात आला आहे. योजनेतील उद्दीष्टे साध्य करण्याबाबत उपलब्ध होणारा निधी प्राधान्यक्रम निकड विचारात घेऊन कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा सहकारी मध्यवर्ती सह. बँकेच्या शेंदुर्णा शाखेत जमा केलेल्या रकमा मिळणेबाबत**

**(८) ९४१३ (१०-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन व ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी यांनी संयुक्तरित्या हवामान आधारित राष्ट्रीय कृषि पिक योजना २०१४ मध्ये राबविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील १५२ गावातील ९९ वि.का. संस्थांना रोख तसेच कर्ज खात्यावर नावे लिहून प्रिमियमच्या करोडो रुपयांची रक्कम बहुसंख्य शेतक-यांनी जळगाव जिल्हा सहकारी मध्यवर्ती सह. बँकेच्या शेंदुर्णा शाखेत जमा केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विमा कंपनीकडून शेतक-यांना विम्याच्या योग्य रक्कमा वेळेवर मिळण्यासाठी राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेंदूर्णी शाखेतून ११ गावातील ९१ शेतकऱ्यांनी रोखीने रु. ९०,५५७/- व ८ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या १७३८ शेतकऱ्यांनी रु. २५,२२,०५६/- कर्जखाती नावे टाकून पीक विमा हप्त्याची रक्कम भरलेली आहे.
(३) पीक विमा योजनेअंतर्गत ११ गावातील ९१ रोखीने पीक घेणारे बिगर कर्जदार शेतकऱ्यांना रु.३,३०,६५४/- व ८ विविध कार्यकारी संस्थांचे १६४७ कर्जदार सभासद शेतकऱ्यांना रु.९२,३९,२५०/- पीक विमा नुकसान भरपाई ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीकडून मिळालेली आहे.

---

## किनवट व माहुर तालुकयातील (जि.नांदेड) शेतक-यांना राष्ट्रीयकृत बँकेकडून पीक कर्जे उपलब्ध होण्याबाबत

**(९) ९८१६ (०९-०४-२०१५). श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट व माहुर तालुक्यातील (जि.नांदेड) आदिवासी नक्षलग्रस्त बहुल भागातील शेतक-यांना वेळवेर पीक कर्ज उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागातील शेतकरी वर्ग खरीप पिकांमुळे त्रस्त झालेल्या असून शेतक-यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतक-यांना राष्ट्रीयकृत बँकांकडून तात्काळ पीक कर्ज मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, तसेच राष्ट्रीय बँकांकडे असलेली ठेवी रद्द करणेबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ८९४४/१३ अन्वये पीक कर्जे मिळणेसाठी दाखल केलेल्या याचिकेत मा. खंडपीठाने पात्र सभासदांना नियम व अटीनुसार कर्ज वितरीत करण्याचे आदेश स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा किनवट यांना दिले होते. त्याअनुषंगाने बँकेने सन २०१३-१४ या वर्षात ३४१ पात्र सभासदांचे एकूण रु. १.५१ कोटी वाटप केले व सन २०१४-१५ या वर्षात २६२ पात्र  सभासदांना एकूण रु. १.०४ कोटी वाटप केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रा.म.मा. ९ या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामात सुरक्षा नियमांचा अवलंब होत नसल्या कारणाने अपघातास जबाबदार असणा-या सर्व संबंधितांवर कायदेशीर कारवाई होणेबाबत**

**(१०) ९९६४ (०७-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रा.म.मा. ९ या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामात सुरक्षा नियमांचा अवलंब होत नसल्या कारणाने झालेल्या अनेक अपघातास जबाबदार असणा-या सर्व संबंधितांवर कायदेशीर कारवाई होणेबाबत उमरगा- लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दि. ३०/०१/२०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितावर कोणतीच कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ च्या चौपदरीकरणाच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार सुरक्षा नियमांचा अवलंब करणेबाबत उद्योजकास संबंधीत प्रकल्प संचालक व तांत्रिक सल्लागार यांनी कळविले असून त्या अनुषंगाने उद्योजकांनी सुरक्षा नियमांचा अवलंब करणे बाबत कार्यवाही केली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, उस्मानाबाद अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाच्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातासाठी व जिल्हयातील इतर ठिकाणी होणाऱ्या अपघाताच्या वाढते प्रमाण कमी करण्याच्या हेतूने नियमित बैठक आयोजित करण्यात येते. राष्ट्रीय महामार्गावरील भुसंपादन विषयक कामे सुरळीत पार पाडण्यासाठी व कायदा सुव्यवस्था विषयक परिस्थिती हाताळण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली असून राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंबंधी समस्येबाबत नियंत्रण ठेवले जाते, असे जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्हा सहकारी बँकेत होत असलेल्या गैरकारभाराबाबत

**(११) १०२८१ (१०-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.पंकज भोयर (वर्धा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा बँकेचे पदाधिकारी करीत असलेल्या गैरकारभाराबाबत अमरावती जिल्हा सरकारी बँक कर्मचारी संघटनेच्या तक्रारीचे अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी केलेल्या चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) होय.

(२) खालील मुद्द्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी सुरु आहे.

१. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या नंतर सुध्दा कर्मचाऱ्यांची पुन्हा बँकेत नियुक्ती करणे.

२. बँकेने सुवर्ण वर्षानिमित्त महोत्सवासाठी केलेला खर्च.

३. बँकेने संगणकीकरणाचे सीबीएसच्या कामकाजासाठी केलेला खर्च.

४. बँकेने अवसायनातील संस्थांना केलेले कर्ज वाटप.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेने अनियमित कर्ज वाटप केल्याबाबत

**(१२) ११९९१ (०९-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेने सुमारे १०० कोटी रुपयांचे अनियमित कर्ज मुंबई उपनगरामध्ये व शहरामध्ये वाटप केले तसेच बँकेचे कार्यालय अनधिकृत झोपडपटटीमध्ये केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

बँकेच्या विरुध्द आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या तपासणी मध्ये मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रु. ११२.९४ कोटीचे अनियमित कर्ज दिल्याचे तपासणी अहवालात

नमूद आहे. तसेच बँकेच्या कांदिवली (पूर्व), सहार व्हीलेज (स्लम) चेंबूर कॉलनी (स्लम) दामू नगर (स्लम) येथील शाखा अधिकृत जागेत आहेत अथवा अतिक्रमण जागेत आहेत याबाबत शंका उपस्थित केली आहे.

(२) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., मुंबई विरुध्द तक्रारी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे दिनांक १७.०१.२०१३ व २३.०१.२०१३ रोजी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने बँकेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये तपासणी करण्यात आली. सदर तपासणी अहवाल दिनांक ०६.१२.२०१४ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे प्राप्त झाला. त्या अनुषंगाने बँकेचा खुलासा मागविण्यात आला असून यातील काही मुद्यांच्या अनुषंगाने चाचणी लेखापरिक्षण आदेशित केले आहे. सदर अहवाल प्राप्त होताच अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करुन स्वतंत्र हिंगोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निर्मिती करण्याबाबत

**(१३) १२९७० (१०-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन स्वतंत्र हिंगोली जिल्हा अस्तित्वात येऊन १५ वर्षांचा कालावधी उलटून ही अद्यापपर्यंत हिंगोली जिल्ह्याकरिता स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निर्मिती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करुन स्वतंत्र हिंगोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार हिंगोली जिल्ह्याकरिता स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) दि.परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करणे बाबत दि. २१.०७.२००८ रोजी सहकार आयुक्तालयास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतू नाबार्डने दिनांक ०५.०३.२००९ चे पत्रान्वये परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन विभाजनाचा प्रस्ताव विचारात घेता येत नाही असे कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुत्पादक कर्जाची रक्कम वाढू नये म्हणून राष्ट्रीयकृत बँकांनी त्या कर्जांचे रुपांतर अल्पमुदतीच्या कर्जात करण्याबाबत

**(१४) १३२५६ (१०-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय बँका अनुत्पादक कर्जाची रक्कम वाढू नये म्हणून त्या कर्जाचे रुपांतर बँकेचे अधिकारी कर्जदार शेतकऱ्यांना विश्वासात न घेता परस्पर अल्पमुदतीच्या कर्जात करीत असून त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना त्या कर्जाचे रुपांतर दुप्पट व्याज द्यावे लागणार असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) मराठवाड्यातील पीक कर्जाची रक्कम सुमारे ५ हजार ४३६ कोटी रुपये इतकी असून या कर्जाचे रुपांतर अल्प मुदतीत झाले नाही, तर शेतक-यांकडून ६ टक्के व्याज आकारले जाईल तसेच कर्ज अल्पमुदतीत रुपांतरीत करण्यात येत असल्याने त्यावर १२ टक्के व्याज आकारले जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशीत करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दुष्काळग्रस्त शेतक-यांना दिलासा देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) नाही. अशी बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही.

(२) नाही. रुपांतरीत मध्य मुदत कर्जाच्या प्रत्येक वार्षिक हप्त्याची परतफेड शेतक-यांनी विहीत मुदतीत केल्यास संबंधित शेतक-यांच्या कर्जावरील २०१५-१६ या वर्षाचे संपुर्ण व्याज तसेच त्यापुढील चार वर्षाचे सन २०१६-१७ ते २०१९-२० वार्षिक सहा टक्के दराने होणारे व्याज शासनामार्फत अदा करण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२९.०७.२०१५ रोजी घेतला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील मांजरा नदीवरील रस्ते व चिखलठाणा ते भातखेडा येथील पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१५) १३२६६ (१०-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील मांजरा नदीवर उभारण्यात आलेल्या बॅरेजच्या पाण्याखाली शेतातील रस्ते गेल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या दिशेने जाण्यासाठी पर्यायी रस्ते व आवश्यक त्या ठिकाणी पूल बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चिखलठाणा (ता.जि.लातूर) येथे मांजरा नदीवर चिखलठाणा ते भातखेडा रस्त्यावर पूलाचे काम अर्धवट स्थितीत बंद पडले असून उर्वरित पूलाचे कॉलम उभे केले असून सदर पूलाचे काम पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ- उस्मानाबाद यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मांजरा नदीवरील रस्ते व पूलांचे बांधकाम करण्याबाबत तसेच चिखलठाणा ते भातखेडा या रस्त्यावरील पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व सदर ठिकाणी रस्ते व पुलांचे बांधकाम करण्याबाबत शासनास किती कालावधी लागणार आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पुलाच्या ठिकाणी खुलगापूर बॅरेजचे बॅकवॉटर असल्याने नदी पत्रात स्लॅबचे काम करता येत नाही. त्यामुळे नदीपत्रात मातीचा भराव करुन काम करणेसाठी तसेच पुलाच्या संकल्पचित्रामध्ये झालेल्या बदलामुळे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) निधीच्या उपलब्धतेनुसार पुलाचे काम पूर्ण करण्यात येईल.

---

**सोलापूर जिल्हयातील पिक कर्जाबाबत खरीप रब्बीसाठी असलेले २५५६ कोटी रुपयांचे उद्दिष्ट बँकानी पूर्ण केले नसल्याबाबत**

**(१६) १३४४५ (१०-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील पिक कर्जाबाबत खरीप रब्बीसाठी असलेले २५५६ कोटी रुपयांचे उद्दिष्ट बँकानी पूर्ण केले नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, या चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधित विषयावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
सोलापूर जिल्हयातील पिक कर्जाबाबत खरिप रब्बी साठी सन २०१४-१५ करीता एकूण रु. २८०० कोटीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते त्यापैकी रु.२४७१ कोटी चे कर्जवाटप करण्यात आलेले आहे.

(२) लक्षांक पूर्तता न झाल्याने जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी समन्वय सभांमधून पीक कर्ज वाटपाबाबत बँकांना सूचित केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील खडकवासला भागात नऱ्हे वडगावातील पुलाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(१७) १४१८७ (१०-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्याती खडकवासला भागात नऱ्हे वडगावातील दुसऱ्या पुलाचे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे काम संपविण्याचा मुदतीत पुलाचे काम पुर्ण होणार आहे काय,
(३) सदर पुलाचे काम संपविण्याची अखेरची मुदत काय आहे,
(४) तसेच पुलाचे काम मुदतपूर्वी पूर्ण न झाल्यास येणारा वाढीव खर्च संबंधित ठेकेदाराकडून वसुल करण्यात येणार आहे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१२-२०१५) :** (१), (२) (३) व (४) पुणे जिल्ह्यातील खडकवासला भागातील नऱ्हे वडगावातील पुलाचे काम पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ हा रस्ता सहापदरी करण्याच्या कामामध्ये अंतर्भुत आहे. सदर पुलाचे काम पुर्ण झालेले असून मे, २०१५ मध्ये तो वाहतुकीस खुला करण्यात आलेला आहे. सदर पुलाच्या कामाचे सवलतकर (PSTRL) व भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेमध्ये झालेल्या पुरवणी करारनाम्यानुसार (Supplementary Agreement) पुलाचे काम पुर्ण होण्याची सुधारीत मुदत दिनांक ३१.१२.२०१५ ही होती तथापि काम सुधारीत मुदतीपुर्वीच पुर्ण झाल्याने वाढीव खर्च संबंधित सवलतकार यांचेकडून वसुल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

---

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत असलेल्या संचालक मंडळामध्ये ठेवीदारांचे दोन संचालक प्रतिनिधी वैद्‌यनाथन समितीच्या शिफारशीनुसार घेण्याबाबत**

**(१८) १४२४१ (१०-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत असलेल्या संचालक मंडळामध्ये ठेवीदारांचे दोन संचालक प्रतिनिधी वैद्‌यनाथन समितीच्या शिफारशीनुसार घेण्याबाबतचे निवेदन माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान स्थनिक लोकप्रतिनिधी तसेच तेथील स्थानिक जेष्ठ नागरिकांनी मा.सहकार मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१६) :** (१) होय.
(२) श्री. प्रभाकर पांडुरंग पाटी रा. सांगलीवाडी यांनी असे निवेदन दिले होते. सदरबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांचे कार्यालयाकडून दि. १५.१२.२०१४ व दि. २२.१२.२०१४ रोजी पत्राने, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली यांना कळविलेले होते.
तथापि, ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी स्विकारलेल्या आदर्श उपविधीमध्ये, ठेवीदारास संचालक मंडळावर घेण्याची तरतूद नसल्याने बँकेस वरिष्ठ कार्यालयाच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करता येत नसल्याचे बँकेने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांचे कार्यालयास कळविले. अर्जदार यांचे संबंधित मागणीप्रमाणे उपविधी स्विकारावा किंवा कसे ही बाब संबंधित बँकेचे संचालक मंडळ व त्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा यांचे अखत्यारितील आहे बँकेने याबाबत अर्जदाराचे निवेदनानूसार तशी उपविधी दुरुस्ती सुचविलेली नाही. तसेच, तत्पुर्वी महाराष्ट्र सहकारी अधिनियम, १९६० मधील सुधांरणाच्या अनुषंगाने सन २०१३ अध्यादेश - महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -६ दि. २५.०४.२०१३ व अध्यादेश क्रमांक -१६ दि. १३.०८.२०१३ अनुसार, सहकारी संस्थांचे सुधारीत आदर्श उपविधीमध्ये तसेच, सहकार कायद्यामध्येही संचालक मंडळाचे रचनेमध्ये ठेवीदारांचे प्रतिनिधीची तरतूद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सकहारी बँकेकडे विमा कंपनीने पिकविम्याचे २ कोटी ६८ लाख रुपये दिले असल्याबाबत

**(१९) १४२४३ (१०-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील सांगली जिल्हा मध्यवर्ती सकहारी बँकेकडे विमा कंपनीने सांगली जिल्ह्यासाठी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये पिकविम्याचे २ कोटी ६८ लाख रुपये दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप वर्ग करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्ग न करण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे. दि. २१.०१.२०१५ रोजी हवामानावर आधारीत पीक विमा खरीप हंगाम २०१४-१५ अंतर्गत नुकसान भरपाई प्राप्त झालेली आहे.

(२) हे खरे नाही. सदरची नुकसान भरपाई दि. ०२.०३.२०१५ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यात चाफेवाडी येथे आश्रमशाळा कर्मचाऱ्यांच्या इमारतीचे बांधकाम रखडल्याबाबत**

**(२०) १६९२१ (३०-०७-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यात चाफेवाडी येथे उभारण्यात येत आलेल्या आश्रमशाळा कर्मचा-यांच्या इमारतीचे बांधकाम सन २०१० पासून अर्धवट स्थितीत बंद पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर बांधकाम किती मुदतीत पुर्ण केले जाईल,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासकिय माध्यमिक आश्रमशाळा, चाफेवाडी येथे इमारत बांधकामांच्या रु.१,७३,०१,५८२/- अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.७/६/२००५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांकरिता ७ निवासस्थाने बांधण्याकरिता रु.२२,३८,०६६/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्यात आली. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.२७/११/२००८ रोजी देण्यात आले होते. त्यानुसार सदर इमारतीचे आर.सी.सी. काम, विटकाम, दरवाजे, खिडक्या इत्यादी काम पूर्ण झाले आहे. त्यावर रु.३७.२० लक्ष इतका खर्च झालेला आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी इमारतीची जागा खोल खड्डयात असल्याने तांत्रिक मान्यतेव्यतिरिक्त तळमजल्याचे काम संबंधित ठेकेदारास करावे लागले त्यामुळे वाढीव खर्च झाला.

सदर इमारतीस बाहेरुन गिलावा, खिडक्यांकरिता ग्रील, मलनि:सारण, पाणी पुरवठा, रंगकाम इत्यादी बाबी अद्याप अपूर्ण आहेत. सदर बांधकाम पूर्ण करण्याकरीता रु.५४,८०,०००/- इतक्या निधीची आवश्यकता आहे. तथापि सार्वजनिक बांधकात विभागाकडून निधी

मागणीबाबतचा सविस्तर प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे. त्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांना कळविले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांच्याकडून मागणी प्राप्त होताच निधी उपलब्ध करुन दिला जाईल व बांधकाम पूर्ण करुन घेतले जाईल.

---

**राज्यातील सहकारी संस्थांचे पत्ते, अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचे पत्ते बनावट असल्याबाबत**

**(२१) १७४२७ (१३-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकारी संस्थांच्या निवडणूकासंदर्भात काही जिल्ह्यात जिल्हा उपनिबंधकामार्फत प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी केली असता राज्यातील सुमारे ३५ हजार सहकारी संस्थाचे पत्ते, अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचे पत्ते बनावट असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बनावट संस्थावर शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) राज्यातील सर्व सहकारी संस्थांचे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी दि.१७.६.२०१५ रोजी परिपत्रक काढले आहे. त्यानुसार सर्वेक्षणाचा कृती आराखडा निश्चित केला असून सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

(२) व (३) सहकारी संस्थांच्या सर्वेक्षणाची मोहिम सुरु असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील बार्शी मधील संतनाथ सहकारी साखर कारखान्याचा विक्री व्यवहार रद्द झाल्याबाबत**

**(२२) १७९९२ (१३-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने थकबाकी पोटी विक्रीला काढलेल्या सोलापूर जिल्ह्यातील बार्शी मधील संतनाथ सहकारी साखर कारखान्याचा विक्री व्यवहार मा.सर्वोच्च न्यायालयाने नुकताच रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी या साखर कारखान्याच्या प्रशासक मंडळाने कारखान्याच्या विक्रीसाठी कोणता निर्णय घेतला आहे, तसेच किती रकमेत सदर कारखाना विक्रीला काढला आहे,
(३) राज्य सहकारी बँकेने आजपर्यंत राज्यातील २५ सहकारी कारखान्याची विक्री केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, बार्शीतील संतनाथ सहकारी साखर कारखान्याचे उदाहरण घेऊन वरील २५ साखर कारखान्याच्या विक्री प्रकरणी चौकशी करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) होय.
(२) सदर कारखाना सिक्युरिटायझेशन ॲक्ट खाली महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात आहे. कारखान्याच्या २८८ एकर जमिनीपैकी १५० एकर जमिनीची विक्री करण्याचा अधिकार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सदर बँकेस दिलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँके जमीन विक्रीची निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(३) होय.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतमालाचे ब्रँडिग करुन माल विक्री करण्याबाबत**

**(२३) १८२९३ (१४-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी पणन विभागातर्फे शेतमालाचे ब्रँडिग करुन तो माल विक्री करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबींवरील शासनाचा निर्णय पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) विदर्भातील "जय श्रीराम" या नावाने सुप्रसिध्द उच्च दर्जाचे धान थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करुन कृषि पणन मंडळामार्फत, त्यावर आवश्यक त्या प्रक्रिया पुर्ण करुन, सदर तांदुळ

राज्यातील मुख्य शहरातील बाजार पेठेत "महाराईस या नावाने ब्रँडीग करुन त्याची विक्री केलेली आहे.

कृषि पणन मंडळामार्फत ब्रँडीग केलेल्या "महाराईस" तांदळाची १० किलोचे पॅकेजिंगमध्ये विक्री करण्यात आली आहे. राज्यातील मुख्य शहरात एकूण ११५३ क्विंटल तांदुळ विक्री केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील १०५ साखर कारखाने एमआरपी प्रमाणात ऊसाला दर देत नसल्याबाबत

**(२४) १८८९७ (१४-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १०५ साखर कारखाने एमआरपी प्रमाणात ऊसाला दर देत नाहीत अशा साखर कारखान्यांवर शासनाने फौजदारी नोटीसा माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान बजाविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती साखर कारखान्यांवर कारवाई करण्यांत आली वा येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) व (२) ऊस नियंत्रण आदेश, १९६६ प्रमाणे FRP प्रमाणे ऊस दर देयके मुदतीत न दिल्यास महसुली वसुली प्रमाणपत्रे (RRC) कारखान्याच्या विरोधात जिल्हाधिकारी यांचेकडे वसुलीसाठी पाठविण्याची तरतूद आहे. सदर आदेशामध्ये फौजदारी कारवाई अभिप्रेत नाही. थकीत FRP संदर्भात साखर आयुक्त कार्यालयामध्ये संबंधित कारखान्याच्या वेळोवेळी सुनावण्या घेण्यात आल्या असून अद्याप सुनावण्या सुरु आहे. सुनावणी नंतरही जादा थकबाकी असलेल्या १० साखर कारखान्यांवर ऊस नियंत्रण आदेश १९६६ प्रमाणे RRC कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सहकारातील घोटाळ्यांची चौकशी करण्यासाठी सहकार विभागातील निवृत्त अधिकाऱ्यांची खास केडरची स्थापना करण्याबाबत

**(२५) १९४०७ (१९-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारातील घोटाळ्यांची चौकशी करण्यासाठी सहकार विभागातील निवृत्त अधिका-यांची खास केडरची स्थापना करण्यात येणार असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घोटाळ्याची कलम ८४ किंवा ८८ ची चौकशी सहकार विभागातील वरिष्ठ अधिका-यांच्या माध्यमातून केल्या जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी खास केडरची स्थापना करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, सदर केडरमध्ये कोणकोणते अधिकारी आहेत व केडरचे काय स्वरुप आहे,
(५) असल्यास, घोटाळ्याची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच संबंधितावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) विभागीय सहनिबंधक कार्यालयांच्या पातळीवर सहकारी संस्थांतील गैरव्यवहाराची महाराष्ट्र सहकार कायदा १९६० चे कलम ८३ व कलम ८८ अन्वये चौकशी करण्याकरीता पॅनेल तयार करण्यात आलेले आहे.
(२) महाराष्ट्र सहकार कायदा १९६० चे कलम ८३ व कलम ८८ अन्वये अशी चौकशी सहकार खात्याचे अधिकारी, पॅनेलमधील व्यक्ती यांचेकडून करण्यात येते.
(३) खास केडरची स्थापना करण्यात आलेली नसून विभागीय कार्यालयांच्या पातळीवर पॅनेल तयार करण्यात आलेले आहे.
(४) सदर चौकशी अधिकाऱ्यांच्या पॅनेलमध्ये सहकार खात्यातील सेवानिवृत्त राजपत्रित अधिकारी, चार्टर्ड अकाऊंटंट, सहकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, वकील यांचा समावेश आहे.
(५) सहकारी संस्थांच्या घोटाळयांची महाराष्ट्र सहकार कायदा १९६० चे कलम ८३ व कलम ८८ अन्वये चौकशी करण्यात आलेली असून कलम ८५, कलम ९५, कलम ९८ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये पस्तीस हजार सहकारी संस्था कागदोपत्री असल्याबाबत**

**(२६) १९४०८ (१४-०९-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३५ हजाराहून अधिक सहकारी संस्था केवळ कागदोपत्री असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य सहकार प्राधिकरणाच्या माध्यमातून निवडणूक घेण्यासाठी प्राधिकरणाने नोटीस बजावून सुध्दा या संस्थांकडून कोणताही प्रतिसाद देण्यात येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा कागदोपत्री संस्थांची शासनाने चौकशी केली आहे काय व सदर चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) त्यानुषंगाने अशा संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) राज्यातील सर्व सहकारी संस्थांचे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी दि.१७.६.२०१५ रोजी परिपत्रक काढले आहे. त्यानुसार सर्वेक्षणाचा कृती आराखडा निश्चित केला असून सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगावं (ता.जि. नाशिक) येथे मार्केट हे बसस्थानकापासून तसेच महामार्गापासून लांब असल्याने शेतकऱ्यांची होत असलेली गैरसोय**

**(२७) १९५४४ (१९-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगावं (ता.जि.नाशिक) येथे शहराला लागुन मोठया प्रमाणात ग्रामीण भाग येत असून बरेच शेतकरी आपला भाजीपाला व फळे विक्रीसाठी मालेगांव येथे येत असतांना परंतू जूने मार्केट हे बसस्थानकापासून तसेच महामार्गापासून लांब असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) होय.

(२) बाजार समितीने मालेगांव मनमाड रस्त्यालगत मनमाड चौफुली येथे जागा भाडेकराराने घेऊन तेथे कामकाज सुरु करण्याबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना सादर केला होता. तथापि, विद्यमान अशासकीय प्रशासक मंडळास कोणतेही धोरणात्मक निर्णय घेण्यास मा.उच्च न्यायालयाने मनाई केलेली असल्यामुळे जिल्हा उपनिबंधक, नाशिक यांनी प्रस्ताव मान्य केलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेण अर्बन बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत**

**(२८) २०५९२ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण अर्बन बँकेच्या मालमत्तांच्या मुल्यांकन विक्री प्रक्रिया संदर्भात व ठेवीदारांच्या प्रश्नासंदर्भात रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीचे अध्यक्ष व ठेवीदारांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत,
(३) सदर निर्णयाच्या अनुषंगाने पेण अर्बन बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) नाही.

पेण अर्बन बँकेच्या मालमत्तांच्या मुल्यांकन विक्री प्रक्रिया संदर्भात व ठेवीदारांच्या प्रश्नासंदर्भात जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी सभा घेण्यात आली आहे.
(२) सदर बैठकीत दि.२४.११.२०१४ रोजी लिलाव प्रक्रियेबाबत गठीत करण्यात आलेल्या समितीच्या कार्यवाहीबाबत माहिती घेऊन सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) पेण अर्बन बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत करणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.०१.२०१५ रोजीच्या सभेत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
अ. महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ४.५ प्रमाणे महाराष्ट्र शासन गृह विभाग, कफ परेड, मुंबई यांचे दि.२४.७.२०१३ चे अधिसुचनेनुसार शासनाने जप्त केलेल्या मालमत्तांपैकी १५ मालमत्तांचा लिलाव करणेबाबत उपविभागीय अधिकारी, पेण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.
ब.सदर समितीने मुल्यांकन प्रक्रियेकरीता मुल्यांकनकर्ता यांची नियुक्ती केली असुन त्यांच्या नियुक्तीस सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा., पुणे यांनी परवानगी दिलेली आहे.

तसेच ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत प्रशासक मंडळ, दि पेण को.ऑप.अर्बन बँक लि., पेण यांनी केलेल्या उपाययोजनांबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.
अ. मुल्यांकनकर्ता यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर मालमत्तांची लिलावाद्वारे विक्री करुन ठेवी परत करण्यात येणार आहेत.
आ. बँकेवर आर्थिक निर्बंध लागु केल्यानंतर प्रत्येक ठेवीदारास रक्कम रु.१०००/- या प्रमाणे १०५९८६ ठेवीदारांना रक्कम रु.१०,४६,७५,०००/- वाटप करण्यात आलेली आहेत तसेच हार्डशिप अंतर्गत ४२६५ ठेवीदारांना रक्कम रु.१८,६२,४९,०००/- वाटप करण्यात आलेली आहेत.
इ. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रु.१०,०००/- (मुद्दल) असलेल्या बँकेच्या ठेवीदारांना ४ आठवड्यात रक्कम अदा करणेबाबत दिलेल्या आदेशानुसार धनादेशाद्वारे ठेवीचे वाटप सुरु असून ३४ ठेवीदारांना रु.१५,५१,२५४/- इतक्या ठेव रक्कमेचे वाटप केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंबा (जि.कोल्हापूर) खाजगी सावकारांवर कारवाई करण्याबाबत**

**(२९) २१४९२ (१९-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंबा (जि.कोल्हापूर) येथील शहरालगतच्या दक्षिणेस असणा-या साळोखेनगर, सुर्वेनगर, तपोवन, संभाजीनगर, साने गुरुजी वसाहत, राजलक्ष्मीनगर, कळंबा शासकीय कारागृह या उपनगरांत खासगी सावकारीमुळे मनमानीपणे व्याज आकारुन गोरगरीबांची कुटुंबे उध्दवस्त झाल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील खाजगी सावकारांपासून या गरीबांची सुटका करण्यासंदर्भात शासनाने कोणती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) नाही.
सदर भागातील खाजगी सावकारीबाबत कोणाचाही तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलडाणा) येथील दी. जनता कमर्शीयल को. ऑ.बॅक लि. खामगाव यांनी कर्जदारांच्या खात्यात काळा पैसा भरल्याबाबत**

**(३०) २१६७७ (१३-०८-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलडाणा) येथील दी. जनता कमर्शीयल को.ऑ.बॅक लि. खामगाव यांनी कर्जदारांच्या खात्यात काळा पैसा भरल्याबाबत तक्रार श्री.रतन मोरे, खामगाव यांनी डायरेक्टर ऑफ इनवेस्टीगेशन (Income Tax) नागपूर यांच्याकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, दी.जनता कमर्शीयल को.ऑ.बँक लि.खामगाव यांचे संचालक श्री. राजेंद्र सानमदार यांनी आर्थिक कुवत नसलेल्या लोकांच्या नावाने लाखो रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डबघाईस आलेल्या सदर बँकेला दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ नंतर सुरु ठेवण्याकरिता ३ कोटी रुपयांच काळा पैसा कर्जदारांच्या खात्यात भरला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण गंभीर प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.

श्री.राजेंद्र सानंदा यांनी आर्थिक कुवत नसलेल्या लोकांच्या नावाने लाखो रुपयाचे शेअर्स खरेदी केले असल्याचे लेखापरिक्षण अहवालावरुन व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे तपासणी अहवालावरुन दिसून येत नाही.

(३) नाही.

बँकेच्या लेखापरिक्षण अहवालावरुन व रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांचे तपासणी अहवालावरुन तसे दिसून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरेच्या कच्च्या मालाच्या आयातीवर राज्यात बंदी घालण्याबाबत**

**(३१) २१९११ (०५-०९-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात साखर उद्योग अस्तित्वात असताना बाहेरील राज्यातून कच्च्या साखरेच्या मालाची मोठ्या प्रमाणात आयात केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखरेच्या आयातीवर तात्काळ बंदी आणावी व ही बंदी अंमलात येईपर्यंत साखरेवरील आयात शुल्क २५ टक्क्यावरुन ४० टक्क्यापर्यंत वाढवावे अशी मागणी राज्य शासनाच्या प्रतिनिधींनी २०१५ च्या माहे एप्रिल महिन्यात केंद्रीय अन्न नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीचा राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय तसेच केंद्र शासनाकडून सदर विषयासंदर्भात राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली व महाराष्ट्रातील साखर उद्योग वाचविण्याकरीता कोणते निर्देश दिले आहेत,

(४) असल्यास, राज्य शासनाने साखरेचा कच्चा माल आयात न करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(५) अद्यापही कोणताचा निर्णय घेतला आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) व (२) बाहेरील राज्यातून कच्च्या साखरेच्या मालाची मोठ्या प्रमाणात आयात केली जात आहे असे निदर्शनास आलेले नाही. मा.मुख्यमंत्री यांनी दि.१४.१.२०१५ च्या निवेदनान्वये मा.पंतप्रधान आणि मा.केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना कच्च्या साखरेवर आयात शुल्क २५ टक्क्यावरुन ४० टक्के करण्याबाबत मागणी केली आहे.

(३) व (४) राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने खालीलप्रमाणे मदत केली / करण्यात येत आहे.

१. राज्य शासनाने सन २०१३-१४ व २०१४-१५ या हंगामाचा ऊस खरेदी कर माफ केलेला आहे.

२. केंद्र शासनाने दि.२७.२.२०१५ च्या अधिसुचनेनुसार १४ लाख मे.टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रति मे.टन रु.४०००/- प्रमाणे अनुदानाचा निर्णय घेतला आहे.

३. राज्य शासनाने दि.२३.६.२०१५ चे शासन निर्णयानुसार राज्यातील साखर कारखान्यांनी हंगाम सन २०१४-१५ मध्ये उत्पादित केलेल्या कच्च्या साखरेच्या निर्यातीस रु.१०००/- प्र.मे.टन प्रमाणे निर्यात अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

४. केंद्र शासनाने सन २०१४-१५ चे हंगामातील FRP अदा करणेसाठी रु.६०००/- कोटीचे पॅकेज जाहीर केलेले असून दि.२३.६.२०१५ चे अधिसूचनेनुसार सॉफ्टलोन योजना लागू केली आहे. दि.२३.६.२०१५ चे अधिसूचनेतील अटी शर्तीनुसार पात्र कारखान्यांना मंजूर होणाऱ्या कर्ज रकमेवर १०% प्रमाणे होणाऱ्या पहिल्या वर्षाच्या व्याजाचा भार केंद्र शासन उचलणार आहे. त्यापुढील ४ वर्षासाठी व्याज अनुदान राज्य शासनाने देण्याचा निर्णय घेतला आहे तसेच केंद्र शासनाच्या विहित निकषात न बसणाऱ्या अशा केवळ सन २०१४-१५ या वर्षात गाळप हंगाम घेतलेल्या २२ साखर कारखान्यांना राज्य शासनाच्या निधीतून या योजनेअंतर्गत ५ वर्षे व्याज अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ढोकी (ता.जि.उस्मानाबाद) येथील तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखानाच्या संचालक मंडळाच्या निवडणूका घेण्याबाबत

**(३२) २२४०९ (२१-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना, तेरणानगर, ढोकी (ता.जि.उस्मानाबाद) च्या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आला असून येथे प्रशासकाची नियुक्ती करून अनियमिततेच्या चौकशीनंतर येथे निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी शेतकरी सभासद तसेच कर्मचाऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील निवडणूक केव्हा घेण्यात आली होती, त्यास किती कालावधी पूर्ण झाला आहे,

(३) असल्यास, संचालक मंडळाचा कालावधी ५ वर्षे केव्हाच पूर्ण होऊन गेला असला तरी अद्याप काही निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत, याची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) होय.

(२) सदर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक दिनांक २६/५/२००७ रोजी घेण्यात आली असून, संचालक मंडळाची मुदत दिनांक १३/७/२०१२ रोजी संपलेली आहे.

(३) संचालक मंडळाचा कालावधी दिनांक १३/०७/२०१२ रोजी संपलेला असला तरी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १६६(४) मधील तरतुदीन्वये सदर कारखान्याचे संचालक मंडळ निवडणूक होई पर्यंतच्या कालावधीसाठी पदारुढ असण्याचे पुढे चालू राहिले होते. कारखान्याच्या संचालक मंडळाने निवडणूकीसाठी केल्यामुळे याद्या सादर करण्याची

आवश्यक कार्यवाही न केल्यामुळे संबंधित निबंधक म्हणजे प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी दिनांक ४/२/२०१५ रोजी प्रशासकीय नियुक्ती करण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु, सदर आदेशाविरुध्द संबंधितांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५२ अन्वये शासनाकडे अपिल दाखल केले असून, अपिलाच्या अनुषंगाने सदर आदेशास दिनांक ०४/०३/२०१५ रोजी शासनाने अंतरिम स्थगिती दिलेली आहे. प्रस्तुत अपिल प्रकरणी अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीत पात्र असलेल्या संस्थांना माहिती न कळविल्याबाबत**

**(३३) २३११७ (१४-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे अडीच लाख सहकारी संस्थांच्या निवडणूकांचा शासनाने कार्यक्रम हाती घेतला असता निवडणूकीत पात्र असलेल्या संस्थांना आपली माहिती प्राधिकरणास कळविणे कायद्याने आवश्यक होते परंतू अनेक जिल्ह्यांमधून शेकडो संस्थांनी अशा प्रकारची माहिती न कळविल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने माहिती न देणा-या संस्थांवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी येथे सहकार न्यायालय सुरु करण्याबाबत**

**(३४) २३२२० (१९-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहकार विभाग शासन निर्णय रा.ज.स.-१००८/प्र.क्र.५३८/५ स, दिनांक ०५/०५/२०११ द्वारे इचलकरंजी येथे सहकार न्यायालय सुरु करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर न्यायालयासाठी १ न्यायाधिश, कनिष्ठ लघु लेखक, शिरस्तेदार, कनिष्ठ लिपीक व शिपाई अशी पदे मंजूर केली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर न्यायालयासाठी जागा व भाडे रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चिती करुन घेण्यात आली असून मंजुरीनंतर ४ वर्षानंतरही हे न्यायालय अद्याप सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर न्यायालय सुरु न होण्याची कारणे काय व न्यायालय सुरु करण्याबाबत शासनाची भुमिका काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर न्यायालयासाठीच्या आवश्यक सोयीसुविधा इचलकरंजी नगरपरिषद यांचेकडून करुन घेणे आणि त्यांचेशी भाडे करार अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे ती पूर्ण झाल्यावर सदर न्यायायल सुरु करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूविकास बँका पुनरुज्जीवित करण्याबाबत**

**(३५) २३२४० (२१-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना दीर्घकालीन कर्ज पुरवठा करणा-या भूविकास बँका बंद करण्याची शिफारस विधी मंडळाच्या उपसमितीने शासनाला केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरात भूविकास बँकेची १५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता असून राज्यशासनाने १८७ कोटी रुपयांची मदत बँकेला केल्यास बँक पुनरुज्जीवित होवू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बँकेच्या माध्यमातून शेतक-यांना होणारा वित्त पुरवठा लक्षात घेता, बँक पुनरुज्जीवित करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना दीर्घकालीन कर्ज पुरवठा करणाऱ्या भूविकास बँका अवसायनात घेण्याची शिफारस मंत्रीमंडळ उपसमितीने शासनास केली आहे.
(२) नाही.
(३) भू-विकास बँकाबाबत मंत्रीमंडळ उपसमितीच्या शिफारशी नुसार दि. १२.५.२०१५ रोजी मंत्रीमंडळ बैठकित धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून त्याअनुषंगाने दि. २४.७.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सदरच्या बँका अवसायनात घेण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खाजगी साखर कारखाने उभारण्यासाठी अनुदान देण्याबाबत

**(३६) २३२८७ (१९-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकारी साखर कारखाने तोट्यात असतानासुध्दा ७५ खाजगी साखर कारखान्याचे प्रस्ताव माहे मे, २०१५ अखेर साखर आयुक्त यांच्याकडे असून त्या सर्व साखर कारखान्यांना एरियल डिस्टन्स प्रमाणपत्र देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी साखर कारखाने उभारण्यासाठी शासनामार्फत अनुदान देण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी साखर कारखाने वाचवण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना शासन अनुदान देणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

---

### माण तालुक्यातील आंधळी विकास सेवा सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक स्थगित करण्यात आली असल्याबाबत

**(३७) २३४१९ (१४-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण तालुक्यातील आंधळी विकास सेवा सोसायटीच्या पदाधिका-याची निवडणूक अधिकारी वेळेत न पोहचल्याने तसेच दोन गटात वाद झाल्याने निवडणूक स्थगित करण्यात आली असल्याचे माहे मार्च २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गंभीर गुन्हे दाखल असणा-या संचालक निवडणूक प्रक्रियेत भाग देण्याबाबत शासनाची कोणती भूमिका आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ क अ मधील १(नऊ) मध्ये ज्या संचालक सदस्यास कोणत्याही कायद्यानुसार १ वर्षापेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीसाठी जेरबंदीची शिक्षा झाली असेल तर तो/ती संचालक मंडळाची सदस्य राहण्यास अपात्र असेल

अशी तरतूद आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात गुन्हे दाखल असणाऱ्या संचालकांना निवडणूक प्रक्रियेपासून रोखण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातून जाणाऱ्या नवापूर ते अमरावती या महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत**

**(३८) २४०२० (१०-११-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) जळगाव जिल्हयातून जाणाऱ्या नवापूर ते अमरावती या पट्टयातील महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाची प्रगती व सद्यःस्थिती काय आहे,
(२) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी जमीन संपादन करण्यात आली वा येत आहे काय,
(३) तसेच जमिन संपादनाचे काम अद्यापही पूर्ण झाले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१२-२०१५) :** (१) अमरावती-धुळे-नवापूर-सूरत या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या चौपदरीकरणाचे काम हे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, भारत सरकार यांच्या अखत्यारीत येते.

सदर रस्त्याचे काम दोन भागात विभागण्यात आले होते.
१. अमरावती ते जळगांव लांबी २७५.२२५ कि.मी.
२. जळगांव ते महाराष्ट्र गुजरात बॉर्डर लांबी २०७.०५० कि.मी.

या कामाचा सवलतकरारनामा अनुक्रमे १) मे. एल. ॲन्ड टी.ईस्ट वेस्ट टोलवेज लि. २) मे. ग्रेट ईस्टर्न टोलवेज लिमिटेड यांच्या सोबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण तर्फे दिनांक ०६.०६.२०१२ रोजी करण्यात आला होता. संबंधित सवलतकारांनी कामे करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सदर करारनामे दि. १०.०९.२०१४ रोजी कामास सुरुवात होण्यापुर्वी रद्द करण्यात आले. सदर कामाचे पुनर्गठन करुन खालील ३ भागात फेरनिविदा मागविण्यात आल्या.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | लांबी (कि.मी.) | एकूण प्रकल्पाची किंमत (कोटी) |
|---|---|---|---|
| १. | अमरावती-चिखली | १९४ | २२८८.१८ |
| २. | चिखली-फागणे | १५० | १८५२.५० |
| ३. | फागणे-गुजरात सिमा | १४०.७९४ | १८८५.७४ |

वरीलपैकी अमरावती ते चिखली तसेच फागणे ते गुजरात बॉर्डर हया कामांचे करारनामे

अनुक्रमे १) मे. अमरावती चिखली एक्सप्रेसवे लिमीटेड २) मे. फागणे सोनगढ एक्सप्रेसवे लिमिटेड या कंपनीसोबत दि. ०८.०९.२०१५ ला करण्यात आले. इतर आवश्यक बाबींची पुर्तता करुन मार्च २०१६ मध्ये प्रत्यक्ष कामास सुरु होण्याची शक्यता असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

तसेच चिखली-फागणे या भागाच्या कामाची निविदा मागविली असता त्यास प्रतिसाद मिळाला नाही व निविदा संबंधी पुढील कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या स्तरावर सुरु आहे, असेही प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(२) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अमरावती यांचे अहवालानुसार प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

भुसंपादनाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ) अमरावती ते चिखली - ९०%

ब) चिखली ते फागणे - ९२%

क) फागणे ते महाराष्ट्र-गुजरात सिमा - ८८%

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कात्रज (जि.पुणे) येथील दूध संघाच्या निवडणूकीमध्ये पोटनियम बदलून प्रतिनिधींची केलेली फसवणूक

**(३९) २४२५२ (२१-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज (जि.पुणे) येथील दुध संघात गेल्या अनेक वर्षापासून संचालक पदावर ठाण मांडून बसलेल्या प्रस्थापितांनी डिसेंबर २०१३ मध्ये निवडणूकीच्या पोटनियमांत आपल्या सोयीची दुरुस्ती करुन उमेदवार पात्रतेचे निकष बदलले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकष पुर्ण न करु शकलेल्या संस्था स्वतः मतदार असूनही निवडणुक रिंगणात उतरु शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा दुध संघाची निवडणुक जाहीर होण्याच्या आधी किमान महिनाभर मतदार निश्चिती करण्याचे काम सुरु होते परंतु यावेळी अनेक संस्थाना निवडणूक पोटनियमांत झालेल्या दुरुस्तीची माहितीच नव्हती, परिणामी अनेक इच्छुकांची फसगत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोटनियम बदलून दुध संस्थाच्या प्रतिनिधीचीच फसवणुक केल्याप्रकरणी चौकशी करुन दुध संघाची फेर निवडणूक घेण्याबाबत निर्णय झाला आहे काय, असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०१-२०१६) :** (१) पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कात्रज, पुणे या संघाने ९७ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे अंमलात आणावयाच्या पोटनियम

दुरुस्तीस संघाच्या दिनांक १५/४/२०१३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत ठरावाप्रमाणे संघाने सादर केलेल्या उपविधी दुरुस्ती प्रस्तावास निबंधक कार्यालयाने दिनांक ६/८/२०१३ रोजी मंजूरी दिलेली आहे व तद्नंतर दिनांक १३/८/२०१३ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संघाच्या सभासदांना माहिती देऊन पोटनियम दुरुस्तीस सभेची मान्यता घेतली आहे.
(२) पुणे जिल्हा सहकरी दुध उत्पादक संघ मर्यादित, कात्रज, पुणे च्या संचालक मंडळ निवडणुक सन २०१५-२०२० करिता ६५ संस्था प्रतिनिधींनी नामनिर्देशनपत्र सादर केले होते.
(३) पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कात्रज, पुणे या संघाने ९७ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे अंमलात आणावयाच्या पोटनियम दुरुस्तीस संघाच्या दिनांक १५/४/२०१३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत व तद्नंतर दिनांक १३/८/२०१३ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संघाच्या सभासदांना माहिती देऊन पोटनियम दुरुस्तीस सभेची मान्यता घेतली आहे. त्यामुळे संघाच्या पोटनियमातील तरतुदींबाबत सभासदांना माहिती होती. संघाचा निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यावर पोटनियमाची व पात्र सभासदांची यादी सर्व संबंधितांना उपलब्ध करुन देण्यात आली होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे २०० ट्रक-ट्रॅक्टर मालकांची**
**५० कोटी रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(४०) २४४१६ (१६-०९-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊस तोडणीसाठी मजूरांची टोळी देतो असे सांगून मुकादमांसाठी पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे २०० ट्रक-ट्रॅक्टर मालकांची ५० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकारामुळे ऊस तोड वाहतूकीचा व्यवसाय धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) ऊस तोडणी मुकादम, वाहन मालक आणि साखर कारखाने यांचे स्तरावरील हा विषय असून महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई यांनी सुचविलेल्या उपाययोजनाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी साखर कारखान्यांना कळविण्यास साखर आयुक्त यांन दि. १७.१०.२०१५ च्या पत्रान्वये साखर संघास सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील पाटणबोरी येथील सुकंडी (पोड)**
**रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४१) २४६०२ (३०-०७-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग क्र.७ वरील सुकंडी गावाकडे जाणा-या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत स्थानिक ग्रामस्थ श्री.चंद्रशेखर सिडाम यांनी संबंधीत विभागास निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे कामात मुरुमाचा वापर न करता रस्त्याच्या बाजुची माती टाकून बारीक गिट्टी व डांबराचे अत्यल्प प्रमाणात वापर करुन काम करण्यात आले, या कामाकरीता वापरण्यात आलेल्या सामुग्रीवरुन रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याचे निदर्शनास येते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत कार्यरत असलेली सी.के.पी.को-ऑपरेटिव्ह बँक डबघाईस आल्याने बँकेच्या**
**आर्थिक व्यवहारांवर निर्बंध घालण्याबाबत**

**(४२) २४६२७ (२३-०९-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ पासून मुंबईत कार्यरत असलेली सी.के.पी.को-ऑपरेटिव्ह बँक डबघाईस आल्याने बँकेच्या आर्थिक व्यवहारांवर निर्बंध घालण्यात आले आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित बँकेत निवृत्त ठेवीदारांची संख्या अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा ग्राहकांचे पैसे परत करण्याकरिता आणि बँकेचे आर्थिक व्यवहार पूर्ववत करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

बँकेतील एकूण बचत खाती धारक ८३०६३ आहे आणि ठेवीदार एकूण ६१३०१ आहेत. त्यापैकी निवृत्त ठेवीदार १७००० आहेत व त्यांच्या ठेवी रु. १,१५,६०,५६,८०४.०० एवढ्या आहेत.

(३) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि. ०७.०५.२०१५ च्या पत्रानुसार सी.के.पी.को. ऑपरेटिव्ह बँक लि.मुंबई या बँकेचे संचालक मंडळ दि. ३१.५.२०२ रोजी बरखास्त झाल्यानंतर बँकेचे ग्राहक व ठेवीदारांमध्ये संभ्रम निर्माण होवून त्यांनी मुदतीपूर्ती झालेल्या ठेवी काढून घेतल्या. त्यामुळे सदर बँकेची खलावलेली परिस्थिती टिकून राहावी याकरिता रिझर्व्ह बँकेच्या पत्रानुसार कलम ३५ अ अंतर्गत सी.के.पी. बँकेवर निर्बध घालण्यात आले व सर्व खातेदारांना त्यांच्या खात्यातून निर्बध लागू असेपर्यंत एकदाच याप्रमाणे रु. १०००/- फक्त देण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्याच प्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार हार्डशिपच्या अंतर्गत जेष्ठ नागरिक, विधवा स्त्रिया, अपंग व्यक्ती यांच्या महिन्याच्या खर्चास्तव दरमहा रु. ५०००/-, बिलारची पडताळणी झाल्यानंतर वैद्यकीय कारणास्तव रु. १,००,०००/- पर्यंत, मुलांचे शिक्षण व लग्न याकारणास्तव रु. ५०,०००/- ठेवीवरील रक्कम काढण्याची मुभा दिलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार खातेदारांकडून अर्ज घेवून ते रिझर्व्ह बँकेकडून मान्य झाल्यानंतरच खातेदारांनादेण्याची व्यवस्था केलेली आहे. आजमितीपर्यंत एकूण ४३१९ अर्ज मंजर झाले असून त्यांना रु.२१०१२०३३०.००एवढी रक्कम मंजूर झालीआहे. तसेच रिझर्व्ह बँकेकडे रु. १२४५००००००.०० एवढ्या रक्कमेचे अर्ज प्रलंबित आहेत. ग्राहकांचे पैसे परत करण्यासाठी व बँकेचे आर्थिक व्यवहार पुर्ववत करण्यासाठी बँकेने थकबाकीदारावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अंतर्गत दावे दाखल केलेले आहेत. दि. १.६.२०१५ ते दि.१०.०९.२०१५ पर्यंत रु. ४३००५.५७ लाख एवढी वसुली झालेली आहे. त्यापैकी अनुत्पादित कर्जाची रक्कम रु. १५८१४.७७ लाख एवढी वसुली झालेली आहे. कलम १०१ खालील दाखले प्राप्त झालेल्या थकबाकीदारांच्या तारण असलेल्या मालमतांवर टाच आणून सदर मालमत्ता जप्त केली असून त्यांची विक्रीबाबतची प्रक्रिया सुरु आहे. तसेच थकबाकीदारांकडील थकीत रक्कमेची वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमळनेर तालुक्यातील तापी नदीवरील लाकडी पुल कायमस्वरुपी चालू करण्याबाबत

**(४३) २५२८१ (३०-०७-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर तालुक्यातील अमळनेर, चोपडा, जळगाव, धरणगाव या चार तालुक्याचा तापी नदीवरील खेडीभोकर, भोकर येथे गेल्या २५ वर्षापासून हंगामी लाकडी पुल हा पावसाळा संपल्यावर काढून टाकण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हंगामी लाकडी पुल कायमस्वरुपी करुन ग्रामस्थांना दळण-वळणाची सोयीच ठरणार असल्याने तेथील तापी परिसरासह चारही तालुक्यातील ग्रामस्थ, शेतकरी, वाहनधारंकाकडून अशी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :** (१) विषयाधीन लाकडी पूल हा जळगाव तालुक्यात असून दरवर्षी पावसाळी सुरु होण्यापूर्वी ३१ मे ला काढून घेण्यात येतो.
(२) होय.
(३) सदर पूल हा पाटबंधारे खात्याच्या पाडळसे धरण प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येत असल्याने पाटबंधारे विभागाकडून या ठिकाणी पूल बांधणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानोरा (जि.वाशिम) येथील पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(४४) २६५४९ (३०-०७-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानोरा (जि.वाशिम) येथील पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे कामाला निधीची मंजूरी होवून सुध्दा बराचसा कालावधी उलटून गेल्या असला तरी सुध्दा अद्यापपर्यंत सदर प्रशासकीय इमारतीचे काम संबंधित कंत्राटदाराकडून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी उपलब्ध असून सुध्दा दिलेल्या वेळेत काम न करणा-या कंत्राटदारावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काटगांव ते देवकुरुथी व (देवकुरुथी) ते पिंपळा (खु.) (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील दोन रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(४५) २७१३२ (०४-०८-२०१५). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काटगांव ते देवकुरुथी व देवकुरुथी ते पिंपळा (खु.) (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील दोन रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद व अधिक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबद यांचेकडे केलेल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) कार्यकारी अभियंता यांनी काटगांव ते देवकुरुथी व देवकुरळी ते पिंपळा (खु.) या कामाची पाहणी केली असता, रस्ता तीन ठिकाणी उखडला असल्याचे दिसून आले. संबंधित ठेकेदाराकडून तात्काळ दुरुस्ती करुन घेण्यात आली असून पाहणी अहवालानुसार कामाची गुणवत्ता योग्य आहे. रस्त्यांच्या पृष्ठभागाचे मजबूतीकरण व डांबरीकरण ही कामे डिसेंबर २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेणुका मजुर कामगार संस्था मोहदरी (ता.उमरखेड,जि.यवतमाळ) यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(४६) २७७०५ (१४-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणुका मजुर कामगार संस्था मोहदरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) यांनी दिनांक १ एप्रिल, २०१३ ते ३१ मार्च, २०१४ या आर्थिक वर्षात सा.बां.विभाग पुसद अंतर्गत ९८ लाख रुपयांची कामे तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२ ची २४ लाख ६० हजार रुपयांची कामे याच आर्थिक वर्षात केली असून यामध्ये दिनांक २ जुलै, २०१४ चे सुमारास याच मजूर कामगार संस्थेवर ३० लाख रुपयांची तीन कामे व लगेच दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी ३० लाख रुपयांच्या तीन कामाचा सा.बां.विभाग, पुसद यांचे मार्फत करारनामा करण्यात येवून यातील बहुतांश कामे न करताच बिले काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मजुर कामगार संस्थेने दोन महिन्याचे कालवधी मध्ये ६० लाख रुपयांची कामे केल्याचे दाखविले आहे परंतु संस्थेचे मजुराची संख्या पहाता दोन महिन्यांमध्ये एवढे काम इतर मजूरांना सोबत घेतल्याशिवाय होऊ शकत नसल्याबाबतची तक्रार श्री.रविंद्र जैन उमरखेड यांनी दिनांक ३० ऑगस्ट, २०१४ चे सुमारास कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, पुसद यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणात संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१६) :** (१) सदर संस्थेस उक्त कामे देण्यात आली, हे अंशत: खरे आहे. तथापि, मजूर सहकारी संस्थाकडून कामे पूर्ण करुन घेऊनच देयके अदा करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुसद (ता.उमरखेड जि.यवतमाळ) येथील वसंत सहकारी साखर कारखाना च्या व्यवस्थापनाने शेतक-याच्या ऊसाचा दर एफ.आर.पी.नुसार न दिल्याने, कर्मचारी वर्गाचे पगार न दिल्याबाबत**

**(४७) २७७०८ (०८-१०-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (ता.उमरखेड जि.यवतमाळ) येथील सन २०१४-१५ या वर्षात वसंत सहकारी साखर कारखान्यात ऊस उत्पादक शेतक-यांनी पुरवठा केलेल्या ऊसास अद्यापपर्यंत एफआरपीनुसार रक्कम न दिल्याने व कर्मचा-याचे वेतन मागील वर्षभरपासून न दिल्याने शेतक-यांनी व कामगारांनी तीव्र आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आत्महत्यग्रस्त यवतमाळ जिल्ह्यात मागील वर्षीच्या दुष्काळामुळे व यंदाचा ऊसाचा दर जून महिना संपत आल्याची एफआरसी नुसार न मिळाल्याने शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काखान्यांचे व्यवस्थापनास शासन एफआरपीनुसार ऊसाचा दर देण्याबाबत व कामगाराचे थकीत पगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) होय.

(२) वसंत सहकारी साखर कारखान्याने सन २०१४-१५ गाळप हंगामात एफआरपी नुसार देय रु. ४१२३.२८ लाख रकमेपैकी रु. ३३७४.०४ लाख देयके शेतकऱ्यांना अदा केली असून दि. ३०.९.२०१५ अखेर कारखान्याकडे रु. ७४९.२४ लाख थकीत आहेत. त्याप्रमाणे कारखान्याच्या कामगारांचे माहे ऑक्टोबर, २०१४ ते ऑगस्ट, २०१५ पर्यंत रु. ५२७.०० लाख वेतन थकीत आहे.

(३) केंद्र शासनाच्या सॉफ्ट लोन योजनेअंतर्गत शासन निर्णय दि. ३०.७.२०१५ अन्वये एफआरपी नुसार रक्कम देण्यासाठी सदर कारखान्यास रु. ६५८.३० लाख कर्ज बँकेकडून देय होते. त्यावरील एक वर्षाचे व्याज अनुदान केंद्र सरकार देणार असून पुढील ४ वर्षाचे व्याज अनुदान राज्य शासन देणार आहे. त्याचप्रमाणे राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने खालीलप्रमाणे मदत केली/करण्यात येत आहे.

१. राज्य शासनाने सन २०१३-१४ व २०१४-१५ या हंगामाचा ऊस खरेदी कर माफ केलेला आहे.

२. केंद्र शासनाने दि. २७.२.२०१५ च्या अधिसुचनेनुसार १४ लाख मे.टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रति मे.टन रु. ४०००/- प्रमाणे अनुदानाचा निर्णय घेतला आहे.

३. राज्य शासनाने दि. २३.६.२०१५ चे शासन निर्णयानुसार राज्यातील साखर कारखान्यांनी हंगाम सन २०१४-१५ मध्ये उत्पादित केलेल्या कच्च्या साखरेच्या निर्यातीस रु. १०००/- प्र.मे.टन प्रमाणे निर्यात अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या कामगारांचे थकित वेतन अदा करण्यासाठी शासनाने कोणतेही धोरण/योजना नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवत-माळशिरस-कापूरहोळ-भोर-सुरुर रस्ते मार्ग क्र.११९ या रस्त्यासाठी अतिक्रमण हटविण्याची केलेली कार्यवाही बेकायदेशीर असल्याबाबत**

**(४८) ३८१६७ (२२-०२-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवत-माळशिरस-कापूरहोळ-भोर-सुरुर रस्ते मार्ग क्र.११९ या रस्त्यासाठी कोणतीही जमिन अॅवार्ड न झाल्याने मोबदला न देता सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभागीय अधिकारी, उपविभाग भोर यांनी त्यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या आदेश पत्रावरुन संयुक्तरित्या भोर तालुक्याचा विशेषत: भोर शहरालगतच्या हद्दीतील अतिक्रमण हटविण्याची केलेली कार्यवाही बेकायदेशीर असल्याचे धक्कादायक घटना निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धानोरा - कोळी (ता.आष्टी, जि.बीड) या राज्य मार्गाची झालेली दुरावस्था**

**(४९) ३८८५९ (१३-०१-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानोरा - कोळी (ता.आष्टी, जि, बीड) या राज्य मार्गाची अत्यंत दुरावस्था झाली असल्याने सद्यस्थितीत स्थानिक ग्रामस्थांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू राज्यमार्गाच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१६) :** (१) धानोरा ते कोळी या नावाचा राज्य मार्ग आष्टी तालुक्यामध्ये अस्तित्वात नाही.

धानोरा ते लोणी असा रस्ता अस्तित्वात असून एकूण लांबी ४५.२०० किमी आहे. ५.०० कि.मी. खराब लांबीपैकी किमी १५/०० ते १७/०० ही २.०० किमी लांबी कुंटेफळ साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रात जाते. ४० किमी लांबीतील रस्ता वाहतुकीयोग्य असून उर्वरीत ३ किमी लांबीचे काम निधी निकष व प्राधान्याचा विचार करुन करण्यात येईल.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड, औरंगाबाद व नाशिक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निलंबित करण्यात आल्याबाबत**

**(५०) ३८९३२ (१३-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील कार्यकारी अभियंता, औरंगाबादच्या दक्षता व गुणनियंत्रण मंडळाचे कार्यकारी अभियंता व नाशिकचे कार्यकारी अभियंता या तिन्ही कार्यकारी अभियंत्याना दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर अभियंत्याना निलंबित करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) वरील तिन्ही कार्यकारी अभियंत्यांना प्रशासकिय कारणास्तव निलंबित करण्यात आले. त्यापैकी

१) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, बीड यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही प्रगतीत असल्यामुळे त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आले नाही.

२) कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे.

३) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, नाशिक यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे. त्यांच्याविरुध्द गंभीर दोषारोप नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी कार्यान्वीत करण्यात आली नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.